

मकर संक्रांतीच्या
सर्वांना मंगलमय शुभेच्छा...!


दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com





वर्ष : ०५ | अंक : १५२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.१४ जानेवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुका जाहीर असा असेल निवडणूक कार्यक्रम

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, मुंबई :** राज्य निवडणूक आयोगाने आज पत्रकार परिषद घेत राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि १२५ पंचायत समितींच्या निवडणुकीची घोषणा केली आहे. या निवडणुकीसाठी ५ फेब्रुवारीला मतदान पार पडणार असून ७ तारखेला मतमोजणी होऊन निकाल जाहीर होणार आहे. निवडणूक आयोगाने या निवडणुकीचा सविस्तर कार्यक्रम जाहीर केला आहे. कोकण, पुणे आणि छत्रपती संभाजीनगर या विभागात ही निवडणूक पार पडणार आहे. कोणत्या जिल्ह्यातील किती पंचायत समितींसाठी ही निवडणूक होणार याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

**१२ जिल्हा परिषदा, १२५ पंचायत समितीतींसाठी निवडणूक**



निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीची घोषणा करताना म्हटले की, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार पंचायत समिती आणि जिल्हा परिषद ५० टक्केपेक्षा कमी आरक्षण आहे. त्यात निवडणूक होणार आहे. एकूण १२ जिल्हा परिषदा, १२५ पंचायत समितीतींसाठी निवडणूक होणार आहे. कोकण विभागातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या जिल्हा परिषदांसाठी मतदान पार पडणार आहे. पुणे विभागातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर या जिल्हा परिषदांसाठी निवडणूक होणार आहे. संभाजीनगर विभागातील संभाजीनगर, परभणी, धाराशिव व लातूर या जिल्हा परिषदांसाठी निवडणूक पार पडणार आहे.

**कोणत्या जिल्ह्यातील किती पंचायती समितींसाठी निवडणूक होणार?**

रायगड – १५
रत्नागिरी – ९
सिंधुदुर्ग – ८
पुणे – १३
सातारा – ११
सांगली – १०
सोलापूर – ११
कोल्हापूर – १२
छत्रपती संभाजीनगर – ९
परभणी – ९
धाराशिव –८
लातूर – १०

**जिल्हा परिषद आणि पंचायत समितीचा कार्यक्रम**

- १६ जानेवारी ते २१ जानेवारी दरम्यान उमेदवारांचा अर्ज स्वीकारला जाईल
- अर्जांची छाननी २२ जानेवारी रोजी होईल.
- उमेदवारी माघारीची अंतिम मुदत – २७ जानेवारी, दुपारी ३ वाजेपर्यंत.
- निवडणूक चिन्ह आणि अंतिम उमेदवार यादी – २७ जानेवारी दुपारी ३.३० वाजेनंतर जाहीर केली जाईल.
- मतदानाचा दिनांक – ५ फेब्रुवारी सकाळी ७ ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत असेल.
- मत मोजणी आणि निकाल – ७ फेब्रुवारी सकाळी १० वाजल्यापासून.

**मतदारांना २ मते द्यावी लागणार**

निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे म्हणाले की, या निवडणुकीत प्रत्येक मतदारांना दोन मते द्यायची आहेत. एक मत जिल्हा परिषद आणि दुसरं मत पंचायत समितीसाठी द्यायचे आहे. यासाठी अर्ज प्रक्रिया ऑफलाईन असणार आहे. नामनिर्देशन प्रक्रिया महापालिकेसारखीच ऑफलाईन असेल. ज्या जागा राखीव आहेत. त्याठिकाणी जातवैधता प्रमाणपत्र पडताळणी आवश्यक आहे. निवडून आल्यावर सहा महिन्यात जातप्रमाणपत्र द्यावं लागेल. नाही दिलं तर त्याची निवड रद्द होईल.

## सावधान! पतंग उडवताना सुरक्षेला प्राधान्य द्या

### मांजापासून हातांचे संरक्षण करण्यासाठी तज्ज्ञांचा महत्त्वाचा सल्ला

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१३, विंचूर (नाशिक) :** मकर संक्रांतीचा सण उत्साहात साजरा करतात स्वतःची काळजी घ्याल. आकाशात रंगीबेरंगी पतंगांची गर्दी होऊ लागली आहे. मात्र, पतंग उडवताना वापरला जाणारा धारदार मांजा (विशेषतः नायलॉन किंवा चायनीज मांजा वापरण्यास बंदी आहे) अनेकांसाठी जीवघेणा किंवा गंभीर दुखापत करणारा ठरू शकतो. पतंगप्रेमींनी आणि नागरिकांनी हा सण साजरा करताना स्वतःच्या सुरक्षेची काळजी कशी घ्यावी, याबाबत काही महत्त्वपूर्ण उपाययोजना आणि खबरदारीचे उपाय समोर आले आहेत.

**● हातांच्या सुरक्षेसाठी हे करा :**

पतंग उडवताना बऱ्याचदा अतिउत्साहात हाताची बोटे कापली जाण्याची शक्यता असते. हे टाळण्यासाठी खालील उपाय करणे आवश्यक आहे:

**१) जाड हातमोजे :** पतंग उडवताना साध्या हाताने मांजा पकडण्याऐवजी लेदरचे किंवा जाड कापडाचे हातमोजे वापरावेत. यामुळे मांजा वेगाने हातावरून घासल्यास जखम होत नाही.

**२) बोटांना सुरक्षा :** ज्या बोटांनी तुम्ही मांजा ओढता (ढील देता किंवा खेचता), त्या बोटांना 'सर्जिकल टेप' किंवा जाड चिकटपट्टी आधीच गुंडाळून ठेवा. यामुळे मांजा थेट त्वचेच्या संपर्कात येत नाही.




**● कपड्यांची निवड :**

हात आणि मनगटाच्या रक्षणासाठी 'फुल बाह्यांचे' कपडे परिधान करा. उघड्या शरीरावर मांजा घासल्यास गंभीर जखम होऊ शकते.

**● दुचाकी चालकांसाठी धोक्याची घंटा :**

रस्त्यावरून दुचाकी चालवताना अनेकदा न दिसणारा मांजा गळ्याभोवती अडकून गंभीर अपघात होतात. हे टाळण्यासाठी दुचाकी चालकांनी खालील काळजी घेणे गरजेचे आहे.

**गळ्याचे संरक्षण :** वाहन चालवताना गळ्याभोवती जाड स्कार्फ, मफलर किंवा रुमाल घट्ट गुंडाळा.

**जॅकेट आणि हेल्मेट :** शक्य असल्यास जाड जॅकेट आणि काच असलेले हेल्मेट वापरा.

**सेफ्टी गार्ड :** दुचाकीच्या हँडलवर लोखंडी 'सेफ्टी वायर' किंवा गार्ड बसवून घ्या, ज्यामुळे मांजा तुमच्या शरीरापर्यंत पोहोचण्याआधीच अडवला जाईल.

**● नागरिकांना आवाहन :**

नायलॉन किंवा चायनीज मांजा वापरणे हे केवळ मानवासाठीच नव्हे, तर पशू-पक्ष्यांसाठीही अत्यंत घातक आहे. त्यामुळे पर्यावरणपूरक आणि साध्या सुती मांजाचाच वापर करावा. तसेच, झाडांमध्ये किंवा विजेच्या तारांवर अडकलेला मांजा उघड्या हाताने ओढू नये, असे आवाहन जागरूक नागरिक आणि प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

सुरक्षिततेचे पालन करूनच मकर संक्रांतीचा आनंद द्विगुणीत करा, असे आवाहन लासलगाव पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक भास्करराव शिंदे व पोलीस निरीक्षक मोहन पाटील यांच्या कडून करण्यात आले आहे.

## मोठी बातमी! अजित पवारांचे राजकीय सल्लागार नरेश अरोरांच्या कार्यालयात पोलीस पोहोचले...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, पुणे :** राज्यभरात महापालिका निवडणुकांच्या प्रचाराच्या तोफा आता थंडावल्या आहेत. यानंतर येत्या १५ जानेवारीला मतदान होणार आहे. मतदान दोन दिवसांवर असताना पुण्यातून सर्वात मोठी बातमी समोर येत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे राजकीय सल्लागार नरेश अरोरा यांच्या कार्यालयावर पोलीस गेल्याची माहिती आहे. पुणे पोलिसांचे क्राईम ब्रांचचे पथक नरेश अरोरा यांच्या कार्यालयात दाखल झाले होते. नरेश अरोरा यांच्याशी संबंधित 'डिझाईन बॉक्स'च्या कार्यालयात पुणे पोलिसांच्या क्राईम ब्रांचची टीम दाखल झाली. या पथकाकडून कागदपत्रांची तपासणी केली जात असल्याची माहिती समोर येत होती. पण पोलिसांच्या या कारवाईवर आता पुणे पोलीस आयुक्तांकडून स्पष्टीकरण देण्यात आलं आहे. नरेश अरोरांवर कोणतीही कारवाई करण्यात आली नसल्याची माहिती पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली आहे.

एकीकडे महापालिका निवडणूक रंगात आलेली आहे. दोन दिवसांवर मतदान आहे. पण असं असताना अचानक पुण्यातील अजित पवारांचे राजकीय सल्लागार नरेश अरोरा यांच्या कार्यालयात क्राईम ब्रांचची टीम पोहोचल्याने अनेकांच्या भुवया उंचवल्या. पोलीस संबंधित कार्यालयात नेमकं का गेले आहेत? ते कोणत्या कागदपत्रांची तपासणी करत आहेत? याबाबत अनेकांना प्रश्न पडला होता. अखेर याबाबत पोलीस आयुक्तांनीच स्पष्टीकरण दिलं आहे.

पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेबाबत वृत्तावाहिन्यांवर वृत्त प्रसारित झाल्यानंतर आता पुणे पोलीस आयुक्त अमितेश



कुमार यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. नरेश अरोरा यांच्यावर कारवाई केलेली नाही, असं अमितेश कुमार यांनी स्पष्ट केलं आहे. गुन्हे शाखेला मिळालेल्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी अधिकारी गेले होते. तक्रारीत तथ्य नसल्याने अधिकारी परतले आहेत, असंदेखील अमितेश कुमार यांनी स्पष्ट केलं आहे.

नरेश अरोरा कोण आहेत?

नरेश अरोरा हे अजित पवार यांचे राजकीय सल्लागार मानले जातात. त्यांची डिझाईन बॉस्क ही कंपनी अजित पवार यांच्यासाठी काम करते. लोकसभा निवडणुकीपासून ही कंपनी अजित पवारांसाठी काम करत आहे. अजित पवारांच्या राजकीय सभांचं नियोजन, अजित पवारांची प्रतिमा जनमानसात कशी जावी, याबाबत रणनीती आखण्याचं काम ही कंपनी करते. तसेच अजित पवारांच्या निवडणूक प्रक्रियेत या डिझाईन बॉक्स कंपनीचं काम महत्त्वाचं मानलं जातं.

## जिल्हास्तरीय सूर्यनमस्कार प्रशिक्षण व योगसाधना शिबीर उत्साहात संपन्न

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, बुलढाणा :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बुलढाणा तसेच आहिल्या योग केंद्र व निसर्ग उपचार केंद्र, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने आज भारत विद्यालय, बुलढाणा येथे जिल्हास्तरीय सूर्यनमस्कार प्रशिक्षण–स्पर्धा व योगसाधना शिबीर उत्साहात पार पडले. राज्यस्तरीय सूर्यनमस्कार शिक्षक प्रशिक्षण मधून प्रशिक्षित मास्टर ट्रेनर्स यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली सूर्यनमस्काराची शास्त्रशुद्ध पद्धत, योगसाधनेचे महत्त्व व नियमित सरावाबाबत सखोल माहिती देण्यात आली.



या शिबिराचा लाभ भारत विद्यालयातील विद्यार्थी व शिक्षकवृंद यांनी घेतला. शिबिरामुळे विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता वाढून योगसाधनेकडे सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला.

कार्यक्रमास भारत विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रल्हाद गायकवाड, क्रीडा अधिकारी एस. एस. केळे यांच्यासह अनेक मान्यवर व मास्टर ट्रेनर्स उपस्थित होते.

## तहसील कार्यालयात कुटुंबाचा अंगावर डिझेल ओतण्याचा प्रयत्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, केज (बीड) :** प्रशासकीय दीरंगाईला कंटाळून केज तहसिलकार्यालयाच्या समोर एका कुटुंबातील चारजणांनी अंगावर डिझेल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. जमीनीच्या मोजणीला महसूल अधिकाऱ्यांनी नकार देत खोडा घातल्याचा आरोप करीत संतापलेल्या लांडगे कुटुंबियाने हे टोकाचा पाऊल उचलण्याचा प्रयत्न केला. मात्र, सावध असलेल्या पोलिसांना वेळीच पाऊल उचलल्याने पुढील अनर्थ टळला. नेमका काय प्रकार पाहूयात

केज – बीड राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या वडीलोपार्जित गायरान जमीनीतील क्षेत्रावर लांडगे कुटुंबाची वहिवाट आहे. मात्र, या जमिनीचा ताबा मिळवण्यात त्यांना कायदेशीर अडचणी येत आहेत. केज न्यायालयाने या जमीनीची मोजणी करुन त्याचे सीमांकन करण्याचा आदेश दिलेला होता. या आदेशाबरहुकूम तहसीलदारांनी १२ जानेवारीला भूमि अभिलेख कार्यालयाचे मोजणी कर्मचारी, मंडळाचे अधिकारी आणि ग्राम महसूल अधिकारी हे जमीनीवर प्रत्यक्ष हजर राहून मोजणी करणार होते.

**अधिकाऱ्यांचे असहकार्य आणि पाऊल उचलले...**

केज मोजणी कर्मचारी घटनास्थळी पोहचले, मात्र मंडळ अधिकाऱ्याने मोजणी प्रक्रियेत सहकार्य केले नाही आणि अहवाल सादर करण्यास टाळाटाळ केली आहे. त्यामुळे अनेक वर्षांपासून न्यायाच्या प्रतिक्षेत असलेले लांडगे कुटुंब संयम सुटला. महसुल विभागाच्या दुर्लक्षामुळे लांडगे कुटुंबाने थेट तहसील कार्यालयाच्या चार सदस्यांनी थेट तहसील कार्यालय गाठले. लांडगे कुटुंबातील सदस्यांनी अंगावर डिझेल ओतले आणि स्वत:ला आग लावल्याचा प्रयत्न केला. मात्र, पोलिस आणि कर्मचाऱ्याने वेळीच त्यांना रोखल्याने अनर्थ टळला.

**प्रकरणाची पार्श्वभूमी**

केज येथील विष्णू श्रीमंत लांडगे आणि त्यांच्या पाच भावडांना सर्व्हे क्र. ३०/१ आणि ३०/२ मधील प्रत्येकी ३२.४४ आर जमीन मा. दिवाणी न्यायालय (क- स्तर), केज येथील दिवाणी दावा क्र. ७५/२०२४ मधील अंतिम हुकूमनाम्यानुसार वाटप झाली आहे. या न्यायालयीन आदेशानुसार मिळालेल्या जमिनीची नोंद महसूल अभिलेखात घेण्यात आली. वाटप तक्ता तयार करण्यासाठी जमिनीची मोजणी करण्याचे आदेश तहसील कार्यालयाने दि. १३ मार्च २०२५ रोजी केज येथील भूमि अभिलेख कार्यालयाला दिले होते.

# राष्ट्रीय भूगोल दिन !



आज १४ जानेवारी, आजचा दिवस संपूर्ण देशात राष्ट्रीय भूगोल दिन म्हणून साजरा केला जातो हे खूपच कमी लोकांना माहित आहे. भूगोल हा विषय आपण लहान वयापासूनच शिकत आलो असूनही भूगोलाचे परिपूर्ण ज्ञान आपल्याला अजूनही मिळवता आले नाही. डॉ सी डी देशमुख हे भूगोल विषयातील अत्यंत जाणकार व्यक्ती मानले जातात. त्यांचे भूगोलातील ज्ञान अफलातून होते म्हणूनच त्यांना भूगोल महर्षी असे म्हटले जाते. भूगोल महर्षी सी डी देशमुख यांचा १४ जानेवारी हा जन्मदिवस. भूगोल विषयात त्यांनी केलेले कार्य अतुलनीय असे आहे. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस राष्ट्रीय भूगोल दिन म्हणून साजरा केला जातो.

भूगोल दिनाच्या निमित्ताने विविध उपक्रम साजरे केले जातात. भूगोल या शब्दाचा सरळ अर्थ पृथ्वीचा गोल असा होतो. भूगोल हा शब्द इंग्रजीतील ऋश्नेसऑरहि या शब्दासाठी पर्याय वापरला जातो. लॅटिन वरून आलेल्या या शब्दाचा अर्थ भुवर्णन शास्त्र. पृथ्वीवरील भौतिक व मानवी पर्यावरणातील रचना, क्रिया व आंतरक्रिया यांचा अभ्यास म्हणजे भूगोल असे स्थूलमानाने मानले जाते. भूगोल म्हणजे मानव व पर्यावरण यांचा संबंध शोधणारे शास्त्र अशी देखील भूगोलाची व्याख्या केली जाते.

**• भूगोलाची तीन गटात विभागणी केली आहे.**

१) प्राकृतिक भूगोल

२) मानवी भूगोल

३) प्रादेशिक भूगोल

प्राकृतिक भूगोलात भूरूप शास्त्र, हवाम ान शास्त्र, जैविक शास्त्र यांचा समावेश होतो. यासोबत किनारी प्रदेश, खनिज शास्त्र आणि नैसर्गिक आपत्ती यांचाही समावेश होतो.

मानवी भूगोलात ऐतिहासिक भूगोल, सांस्कृतिक व सामाजिक भूगोल, लोकसंख्या, आर्थिक व राजकीय भूगोलाचा समावेश होतो.

प्रादेशिक भूगोलात पर्यावरणाचे व्यवस्थापन आणि विविध संसाधन स्त्रोतांचे जनन व संवर्धन यांचा समावेश होतो. भूगोलाच्या सखोल आणि सविस्तर अभ्यासात विविध पद्धतीचा समावेश केला जातो. प्रत्यक्ष क्षेत्र, निरीक्षण, नकाशे यांना भूगोलात महत्वाचे स्थान आहेच पण आजकाल दुरसंवेदी कृत्रिम उपग्रह, द्रोण कॅमेरे, हवाई चित्रीकरण यांनी भूगोलाच्या निरीक्षण क्षमतेत भर घातली आहे.

मानवी जीवनात भूगोलाचे महत्व अनन्यसाधारण आहे. आपण जगतो ते जग, त्याचे स्वरूप विविध प्रदेश, देश, तेथील लोकजीवन यांचे ज्ञान आपल्याला भूगोलाम ुळेच होते.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# हिंदू राष्ट्र... कशासाठी?



हल्ली भारताला 'हिंदू राष्ट्र' घोषित करण्याची मागणी जोर धरताना दिसते. यावर सखोल विचार केला असता सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि वैचारिक कारणे लक्षात येतात. भारत ही प्राचीन वैदिक संस्कृतीची भूमी असून हिंदू धर्म हा या भूमीचा मूळ गाभा आहे.आणि इतर अनेक शांतिप्रिय धर्म या हिंदू धर्माच्याच उपशाखा आहेत.

भारत हे जगातील एकमेव राष्ट्र आहे जिथे हिंदू धर्माचा उगम झाला. त्यामुळे हिंदुत्व ही येथील सांस्कृतिक अस्मिता आहे. जगातील अनेक देशांचे अधिकृत धर्म (उदा. इस्लाम, ख्रिश्चन) आहेत, परंतु हिंदू बहुसंख्य असूनही भारताचा कोणताही अधिकृत धर्म नाही. जे अन्यायकरक आहे.

देशाचे आदराचे स्थान, छत्रपती शिवाजी महाराजांनी 'हिंदवी स्वराज्याची' स्थापना केली होती. स्वातंत्र्यानंतरचे धर्मनिरपेक्षतेचे स्वरूप अनेकदा हिंदू परंपरांकडे दुर्लक्ष करणारे ठरले आहे. त्यामुळे सांस्कृतिक परकीय आक्रमणाची प्रचिती आपण ३१ डिसेंबर, valentine day च्या निमित्ताने घेत आहोतच.

शिवाय हिंदू राष्ट्राला अन्यधर्मीयांचा विरोध असण्याचे काही कारणचं नाही, खरंतर हिंदू विचारसरणी 'वसुधैव कुटुंबकम' (संपूर्ण जग हे एक कुटुंब आहे) मानत असल्याने, हिंदू राष्ट्र हे सर्व धर्मांच्या लोकांचा आदर करणारे आणि त्यांना समान अधिकार देणारे असेल.

राष्ट्रीय सुरक्षा आणि एकात्मतेचा विचार केला तर जेव्हा नागरिक अनेकविध धम र्ऐवजी मूळ सांस्कृतिक मुळांशी (हिंदुत्वाशी) जोडले जातात, तेव्हा राष्ट्र अधिक प्रबळ आणि एकसंध होते. त्यामुळे अंतर्गत शत्रूत्व नष्ट होतेच शिवाय बाह्य आक्रमणांच्या विरोधात एकजुटीने लढता येते.प्रथितयश कायदेतज्ञाच्या मते हे माननीय बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या मूळ संविधानाला अनुसरूनच आहे.

**- सौ.स्वाती हरेर**

# संपादकीय



## आता ग्रीनलँडवर लक्ष!

अमेरिकेने व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो व त्यांच्या पत्नी सिलिया फ्लोरेस यांच्या राजधानी कराकस येथे हल्ला करून केलेल्या अपहरणानंतर डोनाल्ड ट्रम्प यांचे साम्राज्यवादी विचार व धोरण अधिक उघड झाले आहे. त्यात व्हेनेझुएलाचे काही जवान मृत्युमुखी पडले. ही बाब जागतिक शांतता आणि अमेरिकेशी चांगले संबंध नसलेल्या लहान राष्ट्रांना त्रास देणारी आहे. आता व्हेनेझुएलाचे हंगामी सरकार अमेरिकेला तीन ते पाच कोटी बॅरल इंधनाचा पुरवठा करणार असल्याचं ट्रम्प यांनी म्हटलं आहे. त्याच्या विक्रीतून येणाऱ्या रकमेचा उपयोग व्हेनेझुएला आणि अमेरिकेच्या लोकांच्या फायद्यासाठी करण्यात येईल, असंही त्यांनी म्हटलं आहे.

ट्रम्प यांचा डोळा व्हेनेझुएलाच्या तेलावर होता, ही वस्तुस्थिती आहे. ट्रम्प यांची नजर आता ग्रीनलँड, कोलंबिया, मेक्सिको, क्युबा आणि इराणवर आहे. क्युबात तर अमेरिकेने फिडेल कॅस्ट्रो हयात असताना काही वेळा त्यांचे सरकार उलथवून टाकण्याचे आणि त्यांची हत्या करण्याचे प्रयत्न केले होते. व्हेनेझुएलाच्या संदर्भात रशिया, चीन, कोलंबिया, इराणसह अनेक देशांनी अमेरिकेचा निषेध केला आहे. ग्रीनलँडवर ताबा मिळवण्याचा ट्रम्प यांच्या विचारांचा नॉर्थ अटलांटिक ट्रिटी ऑर्गनायझेशनने (नाटो) निषेध केला आहे.

कोलंबिया हा व्हेनेझुएलाच्या शेजारील देश. कोलंबियाच्या विरोधात लष्करी कारवाई करण्याची धमकी ट्रम्प यांनी दिली होती, पण आता सात जानेवारीला डाव्या विचारांचे कोलंबियाचे अध्यक्ष गुस्तावो पेट्रो यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा करून ट्रम्प यांनी त्यांना व्हाइट हाउस येथे चर्चेसाठी आमंत्रित केले आहे. त्यापूर्वी 'कोलंबियात 'एक आजारी' माणूस सत्ता चालवत आहे. त्याला कोकेन आवडतं. कोकेन तयार करणं आवडतं आणि तो ते अमेरिकेत विकतो,' असं ट्रम्प यांनी पत्रकारांना सांगितलं होतं. जगात सर्वाधिक कोकेनचं उत्पादन कोलंबियात होतं. पेट्रो यांनी अमली पदार्थांच्या तस्करीशी कोलंबियाचा काही संबंध नसल्याचं म्हटलं आहे. काही दिवसांपूर्वी त्यांनी ट्रम्प यांना आव्हान दिले होते 'या, मला पकडा. मी तुमची वाट पाहत आहे. आवश्यकता वाटल्यास कोलंबियाच्या सार्वभौमत्वासाठी आम्ही पुन्हा एकदा शस्त्र हाती घेऊ.' मात्र आता परिस्थिती बदलली आहे. ट्रम्प यांनी आता कोलंबियाबद्दल अचानक मवाळ भूमिका घेतली आहे.

मात्र ग्रीनलँडवरून संशय, अनिश्चितता, तणाव वाढत आहे. गेल्या ३०० वर्षांपासून ग्रीनलँड हे डेन्मार्ककडे आहे. हे जगातील सर्वांत मोठे बेट आहे. २,१६६,०८६ चौरस किलोमीटरच्या या बेटावर सुमारे ५७ हजार लोक राहतात. डोनाल्ड ट्रम्प पहिल्यांदा राष्ट्राध्यक्ष झाले तेव्हा, २०१९ मध्ये ग्रीनलँड खरेदी करण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली होती. तेव्हा ग्रीनलँडबद्दल मोठ्या प्रमाणात चर्चा झाली होती. डेन्मार्कच्या पंतप्रधान मेटे फ्रेड्रिक्सन यांनी हा विचार 'हास्यास्पद' असल्याचं तेव्हा म्हटलं होतं. त्या काळात ट्रम्प डेन्मार्कच्या दौऱ्यावर जाणार होते. पण, त्यांना तो रद्द करावा लागला. ग्रीनलँडच्या नेत्यांनी 'ग्रीनलँड विक्रीसाठी नाही','असं स्पष्ट शब्दात सांगितलं होतं. तरीही ट्रम्प यांच्या डोक्यातून ग्रीनलँड काही जात नाही. दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर त्यांनी ग्रीनलँडचा मुद्दा अधिक आक्रमकतेने मांडायला सुरुवात केली. राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून आल्यावर लगेचच २०२४ च्या डिसेंबर महिन्यात ग्रीनलँडबद्दल ते बोलले आणि आता व्हेनेझुएलानंतर ग्रीनलँडचे काय होईल, अशी चर्चा मोठ्या प्रमाणात सुरू झाली आहे. १९४६ मध्ये अमेरिकेचे तेव्हाचे अध्यक्ष हेरी ट्रुमन यांनी ग्रीनलँड खरेदी करण्याचा औपचारिक प्रस्ताव दिला होता. शीतयुद्ध सुरू होण्याचा तो काळ होता आणि या बेटाचं अमेरिकेसाठी सामरिक महत्त्व होतं. पण 'ग्रीनलँड विक्रीसाठी नाही,' असं डेन्मार्कने तेव्हाही म्हटलं होतं. त्यापूर्वी १९१०मध्येही एक प्रस्ताव पुढे आला होता. अमेरिकेचे डेन्मार्क येथील राजदूत मॉरिस फ्रान्सिस इगान यांनी ग्रीनलँडच्या बदल्यात फिलिपीन्सचे मिंदानाव बेट देण्याचा विचार मांडला होता. ते बेट तेव्हा अमेरिकेच्या ताब्यात होते. त्या सूचित प्रस्तावाचा पुढचा भाग डेन्मार्क मिंदानाव जर्मनीला देईल आणि त्या बदल्यात १८६४ मध्ये जर्मनीशी युद्धात गमावलेला नॉर्दन सेल्सविग हा भाग डेन्मार्क घेईल, असा प्रस्ताव होता. मात्र, ही योजना डेन्मार्कला मान्य नव्हती. त्यामुळे ती मागे पडली. ग्रीनलँडमध्ये अमेरिकेचे सैन्य आहे. डेन्मार्कसोबत १९५१ मध्ये झालेल्या कराराप्रमाणे बेटाच्या वायव्येला अमेरिकेचं विमानतळ आहे. त्या ठिकाणी रडार, बालिस्टिक क्षेपणास्त्रं इत्यादी आहेत. अमेरिकेला लष्करी तळांची संख्या करारानुसार वाढवता येणे शक्य आहे. रशिया आणि चीनशी भविष्यात युद्ध झालं तर त्याचा उपयोग होईल, हादेखील विचार ग्रीनलँड ताब्यात घेण्यामागे आहे. त्याचे सामरिक महत्त्व तर आहेच, पण त्या व्यतिरिक्त इतर ही गोष्टी ग्रीनलँडच्या बाबतीत महत्त्वाच्या आहेत.

## संक्रांत सण

मानवैः दव्यकव्यानि
संक्रांतौ यानि दत्तानि
तानि नित्यं ददात्यर्कः
लाभहोई पुनर्जन्मनि

पहिलासण सुखदाई
नववर्षात प्रारंभदिनी
संक्रांत अशुभ असते
अंध श्रध्दा नको मनी

पौष्टिकभाज्या अनेक
हुरडा बोरे ढाळा वनी
गोड गुलाबी थंड हवा
सुशोभित छानअवनी

हळदीकुंकूमसमारोह
विधवा अन् सुवासनी
एकत्र येतात निमीत्ते
मुलगीमाता न् भगिनी

तिळगुळ घ्यावे द्यावे
नातेजपावे आनंदानी
प्रारंभ नवीन पर्वाचा
वैरभाव तो विसरूनि

दानधर्म हे पुण्य कर्म
घडावे चांगले हातूनी
सकल भद्रणीपश्यंति
हुंकार उमळे आतुनि

पतंगोत्सव आनंदाचा
सकल धर्मिया घेऊनि
पर्यावरणा सांभाळावे
नियमासन्मान देऊनि

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

## वाचक पत्रे

### अरबी समुद्रातील छत्रपती शिवाजी महाराजांचे शिवस्मारक कधी होणारं ?

अखंड हिंदुस्थानचे प्रेरणास्थान, महाराष्ट्राची अस्मिता, मराठा साम्राज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी म हाराजांचे मुंबईच्या अरबी समुद्रातील शिवस्मारकाची घोषणा होवून ८ ते १० वर्षे लोटली तरी अजून काही प्रत्यक्षात कामाला सुरुवात झालेली नाही. घोषणा झालेल्या आणि अजून प्रलंबित असलेल्या या स्मारकाला मुहूर्त कधी लागणार, असा प्रश्न विचारला जात असून सद्या संपन्न होत असलेल्या महानगरपालिका निवडणुकीतील वचननाम्यात अथवा चर्चेत कुठे हा विषय आला नसल्याचे समोर आले आहे. फक्त शिवरायांचे नांव घ्यायचे आणि राजकरण करायचे हिच वृत्ती बळावली आहे. त्यामुळे संपूर्ण शिवप्रेमींमध्ये नाराजी पसरली आहे. महाराष्ट्र सरकारसह सर्वचं राजकीय नेत्यांनी एकत्रीत येवून छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवस्मारकासाठी ठोस निर्णय घेणे क्रमप्राप्त आहे. शिवरायांनी आपल्या कार्यकर्तुत्वाने अख्या जगापुढे आदर्श निर्माण केला आहे. त्यांच्या कार्याची प्रेरणा पुढील पिढीसाठी व्हावी आपल्या कारकीर्दीत शिवाजी महाराजांनी मुघल साम्राज्य, गोवळकोंड्याची कुतुबशाही, विजापूरची आदिलशाही आणि युरोपियन वसाहतवादी शक्तींशी युती व शत्रुत्व दोन्ही केले. शिस्तबद्ध लष्कर व सुसंघटित प्रशासकीय यंत्रणेच्या बळावर छत्रपती शिवाजी महाराजांनी एक सामर्थ्यशाली आणि प्रागतिक राज्य उभे केले. किनारी आणि अंतर्गत प्रदेशातील किल्लयांची डागडुजी करण्यासोबतच त्यांनी अनेक नवे किल्लेही उभारले. शिवरायांनी शिस्तबद्ध प्रशासकीय संघटनांसह सक्षम आणि प्रगतीशील नागरी शासन स्थापन केले. त्यांनी प्राचीन हिंदू राजकीय परंपरा, न्यायालयीन अधिवेशने पुनरुज्जीवित केली आहेत. त्यासाठी त्यांच्या सन्मानार्थ मुंबई शहरातील गिरगांव चौपाटीजवळच्या परिसरातील अरबी समुद्रात होणारे छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याचे शिवस्मारक हे २१२ मीटर असून ते जगातील सर्वात उंचीचे असणारं आहे. त्यामुळे हे शिवस्मारक न भूतो न भविष्यती असे ठरणारं आहे. त्यासाठी महाराष्ट्रसह भारत सरकारने देखील लक्ष घालावे.

**- राजू जाधव,**
**मांगूर जि.बेळगांव**

### मतदान ही देशसेवाच !

मतदान हा लोकशाहीतील सर्वात मोठा उत्सव. या उत्सवात सर्व जाती-धर्माची माणसे एकत्र येऊन आपल्या शहराचे, राज्याचे आणि देशाचे भवितव्य कोणी ठरवावे याचा निर्णय घेतात; मात्र या उत्सवात सहभागी होण्याविषयीची उदासीनताही आज तितक्याच प्रमाणात आहे. 'कुणाचीही सत्ता येवो, आपल्या दिनक्रमात काहीही फरक पडणार नाही, मग मतदान करायचे कशाला ?' ही नकारात्मकता लोकशाहीला कमकुवत करते. हीच बुद्धिजीवी मंडळी इतरवेळी मात्र 'लोकप्रतिनिधींनी असा निर्णय घ्यायला हवा होता,शहरात तसे घडायला हवे होते' यावर तासनतास चर्चा करतात. ज्यांना मतदान करण्यासाठी अर्धा तास वेळ काढता येत नाही त्यांना खरे तर समाजाच्या परिस्थितीवर भाष्य करण्याचाही नैतिक अधिकार नाही. सैन्यात भरती होऊन देशप्रेम दाखवण्याची संधी सर्वांनाच मिळत नाही; मात्र आपल्या जिल्ह्याची, राज्याची आणि देशाची धुरा सांभाळण्यासाठी योग्य उमेदवार निवडून देण्याची संधी तर सर्वच प्रौढांना मिळते, त्या संधीचा लाभ घेणे ही देशसेवाच आहे ही भावना लोकांमध्ये रुजायला हवी.

**- ज्योती रावराणे,**
**कांजूरमार्ग**

# मटणापेक्षाही या डाळी शरीरासाठी फायदेशीर, कोणती डाळ अधिक चांगली ?

**"डाळी भारतीय आहाराचा अविभाज्य भाग आहेत, ज्या शरीराला प्रथिने, फायबर आणि अनेक पोषक तत्वे देतात. मूग, मसूर, चणा, तूर आणि उडीद या प्रत्येक डाळीचे स्वतःचे विशेष फायदे आणि गुणधर्म आहेत. पचनशक्ती आणि शरीराच्या प्रकारानुसार योग्य डाळ निवडणे महत्त्वाचे आहे. कमकुवत पचनशक्ती असलेल्या लोकांसाठी मूग डाळ उत्तम असून, इतर डाळींचे फायदे समजून घेणे आवश्यक आहे.**

देशातील प्रत्येकाच्या आहारात डाळी असतातच असतात. काही डाळी तर म टणापेक्षाही अत्यंत फायदेशीर असतात. या डाळींमध्ये शरीराला प्रथिने, फायबर, जीवनसत्त्वे आणि खनिजे पुरवतात, ज्यामुळे आरोग्य मजबूत राहते. मात्र, सर्व डाळींचा शरीरावर समान परिणाम होत नाही. प्रत्येक डाळीचा स्वभाव आणि परिणाम वेगळा असतो. म्हणूनच डाळी नेहमी आपल्या शरीराच्या प्रकारानुसार आणि पचनशक्ती लक्षात घेऊन निवडाव्यात. चला जाणून घेऊया की कोणती डाळ कोणते फायदे देते आणि ती कशी खावी?

**✦ मूगाची डाळ**

या यादीत सर्वात आधी मूगाची डाळ येते. डॉक्टरांच्या मते मूगाची डाळ सर्वात हलकी आणि पचायला सोपी मानली जाते. ती पोटावर ताण देत नाही, गॅस आणि ॲसिडिटी कमी करण्यास मदत करते, तसेच वजन नियंत्रणात ठेवू इच्छिणाऱ्यांसाठीही उपयुक्त आहे. कमजोर पचनशक्ती असलेले लोक, लहान मुले, वृद्ध आणि आजारातून बरे होत असलेले लोक ही डाळ सहजपणे खाऊ शकतात. ती आरोग्यासाठी फायदेशीर आहे.

**✦ मसूर डाळ**

मसूर डाळीत भरपूर प्रमाणात लोह (आयर्न) असते, त्यामुळे ती ॲनिमिया असलेल्या लोकांसाठी फायदेशीर ठरते. ती ऊर्जा वाढवते आणि थकवा कमी करते. मात्र, काही लोकांम ध्ये ती थोडा गॅस निर्माण करू शकते, त्यामुळे ज्यांची पचनशक्ती कमजोर आहे त्यांनी प्रम ाणातच सेवन करावे.

**✦ चणाडाळ**

चणाडाळ प्रथिने आणि फायबरचा उत्कृष्ट स्रोत आहे. ती हळूहळू पचते, त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत करते आणि अचानक साखर वाढू देत नाही. मात्र, ती थोडी जड असल्याने ज्यांची पचनशक्ती कम जोर आहे त्यांनी ती कमी प्रमाणात आणि नीट शिजवून खावी.

**✦ तूर डाळ**

तूर डाळ शक्तिदायक आणि संतुलित मानली जाते. ती ना फार जड असते ना फार हलकी, त्यामुळे दैनंदिन वापरासाठी उत्तम पर्याय आहे. ती शरीराला पोषण, ताकद आणि स्थिर ऊर्जा प्रदान करते.

**✦ उडीद डाळ**

उडीद डाळ हाडे आणि स्नायूंना बळकट करण्यासाठी उपयुक्त मानली जाते. ती कॅल्शियम आणि इतर पोषक घटकांनी समृद्ध असते. मात्र, ती गॅस, ॲसिडिटी आणि मूळव्याध वाढवू शकते, त्यामुळे अशा समस्या असलेल्या लोकांनी तिचे सेवन सावधपणे करावे.

डाळ निवडताना आपल्या पचनसंस्थेचा, गरजांचा आणि शरीराच्या प्रकाराचा विचार करा. योग्य प्रमाणात आणि योग्य पद्धतीने तयार केलेली डाळ शरीराला उत्तम पोषण देते.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

### महाराष्ट्र राज्य माहिती आयोग कर्मचारी संघटनेतर्फे मंत्रालयात रक्तदान शिबिर संपन्न



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१३, मुंबई :** मंत्रालयातील नवीन प्रशासन भवन येथे महाराष्ट्र राज्य माहिती आयोग कर्मचारी संघटनेच्या द्वितीय वर्धापन दिनाचे औचित्य साधून भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन राज्याचे राज्य मुख्य माहिती आयुक्त राहुल पांडे यांच्या हस्ते झाले. विशेष म्हणजे त्यांनी स्वतः रक्तदान करून या सामाजिक उपक्रमाची प्रेरणादायी सुरुवात केली.यावेळी राहुल पांडे यांनी संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त सर्व सदस्यांना शुभेच्छा देत रक्तदानाचे महत्त्व उपस्थितांना पटवून दिले. तसेच काही रक्तदात्यांना त्यांच्या हस्ते प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. या कार्यक्रमास राज्य माहिती आयुक्त शेखर चन्ने, अशोक जाधव (प्रबंधक, लोक आयुक्त कार्यालय), नाईक (कक्ष अधिकारी), रमेश लवंडे (चेअरमन), रसाळ, शेलार, कापडी, गोटेकर, साने यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच सविता जावळे (सचिव, मुख्यालय), अभय भंडारी (कक्ष अधिकारी), रोहिणी जाधव (उपसचिव), ज्योत्स्ना शिंदे (स्वीय सहाय्यक), पोळ, कुलवंत, गणेश कठाळे (कक्ष अधिकारी), प्रवीण पुणसे, महेश सांगळे (सरचिटणीस) आदी अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या रक्तदान शिबिरास शासकीय अधिकारी व कर्मचारी वर्गाकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून सुमारे १५० हून अधिक रक्तदात्यांनी सहभाग नोंदवला. शासकीय सेवेत कार्यरत असतानाच सामाजिक बांधिलकी जपण्याचा संघटनेचा हा स्तुत्य उपक्रम ठरला. संघटनेचे अध्यक्ष प्रल्हाद जोशी, संघटक सचिव दत्ता जावळे, उमेश जाधव, नरेश मुळीक, दिलखुष पाटील, नरेंद्र मोरे, वृंदावन पोकळे, रोहित जाधव, संदीप मोहिते व मिलिंद शोभने यांनी रक्तदान करून उपक्रमास पाठबळ दिले. विशेष म्हणजे दिलखुष पाटील यांचे हे बारावे रक्तदान होते. शिबीर यशस्वी पार पाडण्यासाठी सुवर्णा साळुंखे (खजिनदार) नागेश पवार (सह खजिनदार), प्रणाली परब, अश्विनी मयेकर, मनोज हरड, गणेश महाडिक, सुजल कांबळे, सिद्धेश दिवटे, चिराग साळुंके यांचे ही मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दत्ता जावळे यांनी केले. समाजहिताच्या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून संघटनेचे अध्यक्ष प्रल्हाद जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली व सदस्यांच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

### रविवारी उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती निफाड मधे...



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१३, विंचूर (नाशिक) :** राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नाशिक, जिल्हा प्रशासन, नाशिक व तालुका विधी सेवा समिती, निफाड यांच्या संयुक्त विद्यमाने निफाड येथे विधी सेवा शासकीय योजनांचे महाशिबिर आयोजित करण्यात आले असल्याची माहिती निफाडचे तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी दिली आहे. या महाशिबिराचे उद्घाटन रविवार, दि.१८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता माननीय न्यायमूर्ती श्री.सारंग व्ही कोतवाल, न्यायमूर्ती, उच्च न्यायालय, मुंबई तथा पालक न्यायमूर्ती, नाशिक यांच्या शुभहस्ते होणार आहे. यावेळी माननीय न्यायमूर्ती जितेंद्र शा.जैन व न्यायमूर्ती अश्विन डी.भोबे, न्यायमूर्ती, उच्च न्यायालय, मुंबई तथा पालक न्यायमूर्ती, नाशिक यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमास एस.डी.जगमलानी, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली आयोजन करण्यात आले आहे. हे महाशिबिर तहसील कार्यालय प्रांगण, निफाड (जि.नाशिक) येथे संपन्न होणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विधी सेवा शासकीय योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन निमंत्रक, आयुष प्रसाद भारतीय प्रशासकीय सेवा जिल्हाधिकारी नाशिक, श्री अ.अ.अ शेख जिल्हा न्यायाधीश १ अतिरिक्त सत्र न्यायाधीश निफाड तथा अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती निफाड, सुहास प्र भोसले सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांनी केले आहे.

### गिलबीली येथे अनुसूचित जाती, जमाती दक्षता समितीची सभा

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, विसापूर (चंद्रपूर) :** आपली व्यवस्था पूर्वी राजेशाही स्वरूपाची होती. त्यानंतर परकीय पारतंत्र्यात आपली जडणघडण झाली. आज आपण लोकशाही अनुभवत आहोत. मात्र, याची पाळेमुळे खोलवर रुजली नाही. परिणामी कायदे असूनही वंचित घटकांना न्याय मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागतो. संविधानात्मक कायदे लागू आहेत. त्या कायद्याचे आपणाकडून पालन होत नाही. यासाठी सामाजिक सौहार्दाची पाळेमुळे खोलवर रुजवणे आज देखील आवश्यक आहे, असे प्रतिपादन बल्लारपूरचे उपविभागीय अधिकारी अर्जुन पावरा यांनी केले. बल्लारपूर पंचायत समिती व उपविभागीय कार्यालयाच्या वतीने तालुकास्तरीय दक्षता समितीच्या वतीने गिलबीली येथे मंगळवार, दिनांक १३ जानेवारी २०२५ रोजी यशोधादेवी आदिवासी निवासी शाळेच्या सभागृहात अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्यान्वये जनजागृती सभा पार पडली. यावेळी ते अध्यक्ष स्थानावरून बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून बल्लारपूर तालुका अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध दक्षता व संनियंत्रण समितीचे अध्यक्ष तथा उपविभागीय अधिकारी डॉ. अर्जुन पावरा, सदस्य ॲड.हरिश गेडाम, विसापूरचे उपसरपंच अनेकश्वर मेश्राम, बल्लारपूर पंचायत समितीचे आरोग्य विस्तार अधिकारी साहेबराव पवार, श्रीमती यशोधरादेवी आदीवासी निवासी शाळेचे अधिक्षक धनराज ताडाम, मुख्याध्यापक डी.आर.निरंजने, बि.आर.पिपरे, गिलबीली ग्रामपंचायत सदस्य रामचंद्र सुरपाम, ग्रामपंचायत अधिकारी सुषमा नंदेश्वर यांची उपस्थिती होती. दरम्यान याप्रसंगी क्रांतीसुर्य भगवान बिरसा मुंडा व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला मालार्पण व दीपप्रज्वलन करून मान्यवरांच्या हस्ते जनजागृती सभेचे उदघाटन करण्यात आले. यावेळी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रतिबंध कायद्याची माहिती ॲड.हरिश गेडाम यांनी दिली. दक्षता समितीचे सदस्य अनेकश्वर मेश्राम यांनी देखील मार्गदर्शन केले. प्रास्ताविकातून साहेबराव पवार यांनी जनजागृती सभेची व दक्षता तथा संनियंत्रण समितीच्या कार्याचा अहवाल सादर केला. कार्यक्रमाचे संचालन शिक्षक तुषार चिचघरे यांनी केले. आभार प्रदर्शन कैलास उलमाले यांनी केले. यावेळी विद्यार्थी व गावकऱ्यांची उपस्थिती होती.

## ठाणे जिल्ह्यात १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी दरम्यान 'अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान'

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१३, ठाणे :** सिकलसेल ॲनिमिया आजाराचे प्रमाण अधिक असलेल्या राज्यातील २१ जिल्ह्यांमध्ये महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत 'अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया विशेष अभियान' राबविण्यात येत आहे.

राष्ट्रीय सिकलसेल ॲनिमिया निर्मूलन मिशन अंतर्गत ठाणे जिल्ह्यासह संपूर्ण राज्यात हा आजार समूळ नष्ट करण्याच्या उद्देशाने हे अभियान १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत प्रभावीपणे राबविले जाणार आहे. हे अभियान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर तसेच सार्वजनिक आरोग्य विभागाच्या राज्यमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनानुसार राबविले जात आहे.

ठाणे जिल्ह्यात हे अभियान जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली राबविले जाणार असून, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांच्या तांत्रिक मार्गदर्शनाखाली जिल्हा आरोग्य यंत्रणा सज्ज झाली आहे. अभियानाचा उद्देश व सद्यस्थितीसिकलसेल ॲनिमिया हा एक गंभीर आणि अनुवंशिक रक्तविकार असून या आजारामध्ये लाल रक्त पेशींचा आकार बदलून कोयत्यासारखा (Sickle) होतो. परिणामी रक्तप्रवाहात अडथळे निर्माण होऊन रुग्णांना तीव्र वेदना, संसर्ग आणि जीवघेण्या गुंतागुंतींचा सामना करावा लागतो.




केंद्र शासनाने २०४७ पर्यंत सिकलसेल ॲनिमिया आजाराचे समूळ उच्चाटन करण्याचे ध्येय निश्चित केले आहे.

ठाणे जिल्ह्यात ०० ते ४० वर्ष वयोगटातील एकूण लोकसंख्या सुमारे १३ लाख असून यापैकी ४ लाख ५२ हजार नागरिकांची तपासणी यापूर्वीच करण्यात आली आहे. उर्वरित नागरिकांची तपासणी या विशेष अभियानांतर्गत करण्यात येणार आहे. सध्या जिल्ह्यात १,८५७ सिकलसेल वाहक (Carrier) आणि ११४ सिकलसेल रुग्ण (Sufferer) आढळून आले आहेत. पुढील पिढीमध्ये या आजाराचा प्रसार होऊ नये, यासाठी व्यापक तपासणी व जनजागृती करणे हेच या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे. अभियानांतर्गत उपलब्ध मोफत सुविधा १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील ३३ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ८ ग्रामीण रुग्णालये तसेच जिल्हा रुग्णालयांमध्ये खालील सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

१. मोफत तपासणी – ० ते ४० वर्ष वयोगटातील नागरिकांची सोल्यूबिलिटी टेस्ट तसेच निदानासाठी एच.पी.एल.सी. (HPLC) तपासणी.

२. मोफत उपचार - सिकलसेलग्रस्त रुग्णांना हायड्रॉक्सीयुरिया, फॉलिक ॲसिड औषधे व आवश्यकतेनुसार मोफत रक्त संक्रमण.

३. आर्थिक सहाय्य –पात्र सिकलसेलग्रस्त रुग्णांना संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत अर्थसहाय्य मिळवून देणे.

४. समुपदेशन सेवा – विवाहपूर्व व प्रसूतिपूर्व समुपदेशनावर विशेष भर देऊन सिकलसेलग्रस्त बालकांचा जन्म टाळण्यासाठी मार्गदर्शन.

जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांनी ठाणे जिल्ह्यातील सर्व नागरिकांना, विशेषतः आदिवासी बांधवांना आवाहन केले आहे की, लग्नाआधी व लग्नानंतर प्रत्येक दांपत्याने सिकलसेल तपासणी करून घ्यावी. सिकलसेल वाहक किंवा रुग्ण व्यक्तींनी विवाहपूर्व योग्य समुपदेशन घेऊन पुढील पिढी सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक ती काळजी घ्यावी. तपासणी म्हणजे भीती नव्हे, तर सुरक्षित आणि निरोगी भविष्यासाठी उचललेले पहिले पाऊल आहे. सुदृढ व सिकलसेल मुक्त ठाणे जिल्हा घडवण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे.चला तर मग, 'सिकलसेल मुक्त ठाणे जिल्हा' या संकल्पनेसाठी आपण सर्वजण एकत्र येऊया.

## यंदाची मकर संक्रांत 'तिळी एकादशी'च्या पर्वावर; २३ वर्षांनंतर आला दुर्मिळ योग

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१३, विंचूर (नाशिक) :** हिंदू संस्कृतीत अत्यंत महत्त्वाचा आणि आनंदाचा सण मानली जाणारी मकर संक्रांत यंदा दिनांक १४ जानेवारी २०२६ रोजी येत आहे. विशेष म्हणजे या दिवशी पौष वद्य एकादशीचा योग जुळून आला आहे. या दिवशी दुपारी ३ वाजून ०६ मिनिटांनी सूर्य मकर राशीत प्रवेश करणार आहे.

सूर्याच्या मकर राशीतील प्रवेशाचा हा 'पर्वकाल' सायंकाळपर्यंत असणार असल्याची माहिती श्री. वे. सुभाष (बापू गुरुजी) जोशी यांनी दिली



आहे.यावर्षी संक्रांत आणि एकादशी एकाच दिवशी आल्याने भाविकांमध्ये पूजेबाबत संभ्रम असू शकतो. याबाबत सविस्तर मार्गदर्शन करताना बापू गुरुजींनी स्पष्ट केले की, १४ जानेवारीला एकादशीचा पर्वकाल आहे. त्यामुळे त्या दिवशी वायन पूजन (खण पूजन) करून देवाला तिळा-गुळाचा नैवेद्य दाखवावा. यापूर्वी सन २००३ मध्ये अशाच प्रकारे संक्रांत आणि एकादशी एकाच दिवशी आली होती.

या विशेष योगाला 'तिळी एकादशी संक्रांत' असेही संबोधले जाते.१५ तारखेला करा गोड नैवेद्य संक्रांतीच्या दुसऱ्या दिवशी, म्हणजेच १५ जानेवारी २०२६ रोजी 'कर' आहे. कर ही संक्रांतीची बहीण मानली जाते, जिला 'किंक्रांत' असेही म्हणतात. त्यामुळे घरात गोडधोड जेवण, गोड नैवेद्य आणि सुवासिनी भोजन (हळदी-कुंकू) १५ जानेवारी रोजी करावे, असे शास्त्रोक्त मत गुरुजींनी व्यक्त केले आहे.

**अफवांवर विश्वास ठेवू नका :-**

सध्या सोशल मीडियाच्या माध्यमातून सणाबाबत अनेकदा चुकीची माहिती पसरवली जाते. त्यामुळे नागरिकांनी कुठल्याही अफवांवर विश्वास न ठेवता, शास्त्रोक्त माहितीनुसार १४ तारखेला संक्रांत साजरी करावी, असे आवाहन श्री.वे.सुभाष (बापू गुरुजी) जोशी यांनी केले आहे.

## १५ जानेवारीस मतदानाकरिता भरपगारी सुट्टी देणे बंधनकारक

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१३, मुंबई :** राज्यातील २९ महानगर पालिकांसाठी येत्या दिनांक १५ जानेवारी २०२६ रोजी सार्वत्रिक निवडणूक होत आहे. या निवडणुकीमध्ये मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता यासाठी उद्योग, आस्थापना व कारखान्यांमधील कामगार कर्मचाऱ्यांना या दिवशी सुट्टी किंवा सवलत देणे बंधनकारक करण्यात आल्याचा शासन निर्णय उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने जारी केली आहे.

महानगरपालिका क्षेत्रांतील केंद्र शासनाची कार्यालये, निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, बँका, शैक्षणिक तत्सम आस्थापनांनाही ही सार्वजनिक सुट्टी लागू राहील, असे सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

या शासन निर्णयानुसार निवडणूक क्षेत्रात तसेच क्षेत्राबाहेर कार्यरत असलेल्या सर्व कामगार, अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदानासाठी सुट्टी देण्यात यावी, असे आदेश आस्थापनांना देण्यात आले आहेत. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने, हॉटेल, निवासस्थाने, आयटी कंपन्या, मॉल्स, शॉपिंग सेंटर्स, किरकोळ विक्रेते आदींना हे आदेश लागू राहणार आहेत.अपवादात्मक परिस्थितीत पूर्ण दिवसाची सुट्टी देणे शक्य नसल्यास किमान ३ तासांची विशेष सशुल्क सवलत देणे बंधनकारक करण्यात आले आहे. या आदेशांचे पालन न केल्यास संबंधित आस्थापना मालकांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे शासन निर्णयात सूचित करण्यात आले आहे. सार्वजनिक सुट्टी लागू असलेल्या महानगर पालिकांमध्ये बृहन्मुंबई, ठाणे, नवी मुंबई, उल्हासनगर, कल्याण-डोंबिवली, भिवंडी-निजामपूर, मीरा-भाईंदर, वसई-विरार, पनवेल, नाशिक, मालेगाव, अहिल्यानगर, जळगाव, धुळे, पुणे, पिंपरी-चिंचवड, सोलापूर, कोल्हापूर, इचलकरंजी, सांगली-मिरज-कुपवाड, छत्रपती संभाजीनगर, नांदेड-वाघाळा, परभणी, जालना, लातूर, अमरावती, अकोला, नागपूर आणि चंद्रपूर यांचा समावेश आहे.

## रोड शोच्या माध्यमातून भाजपचे शक्तिप्रदर्शन

### ५ हजारांहून अधिक दुचाकींच्या सहभागाने चंद्रपूरात शक्तिप्रदर्शन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, चंद्रपूर :** चंद्रपूर महानगरपालिका निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी, शिवसेना व आरपीआय (आठवले गट) यांच्या वतीने महायुतीच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित भव्य रोड शो मंगळवार, दिनांक १३ जानेवारी २०२६ रोजी दुपारी चंद्रपूर शहरात उत्साहात व जल्लोषात पार पडला.

या रोड शोमध्ये तब्बल ५ हजारांहून अधिक दुचाकी सहभागी झाल्या होत्या. युवकांचा प्रचंड सहभाग, घोषणांचा गजर आणि पक्षाचे झेंडे यामुळे संपूर्ण शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. यावेळी पालकमंत्री डॉ.अशोक उईके, राष्ट्रीय ओबीसी आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर, भाजप नेते आमदार सुधीर मुनगंटीवार, आमदार किशोर जोरगेवार, आमदार मिलिंद नरोटे, आमदार राजू तोडसाम, माजी आमदार संजीवरेड्डी बोदकुलवार, भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष हरिष शर्मा यांच्यासह इतर पदाधिकारी




उपस्थित होते. दुपारी ३ वाजता नेहरू नगर जॉगर्स पार्क, बंगाली कॅम्प येथून रोड शोचा प्रारंभ झाला. त्यानंतर आदर्श पेट्रोल पंप, सी.एच.एल.हॉस्पिटल, गुरुद्वारा, जटपुरा गेट, गिरनार चौक, गांधी चौक मार्गे हा रोड शो जोडदेऊळ चौक येथे पोहोचला. येथे रोड शोचे रूपांतर सभेत झाले. मार्गभर नागरिकांनी रोड शोचे उत्स्फूर्त स्वागत केले. महायुतीच्या माध्यमातून शहरात झालेल्या विकासकामांचा संदेश घराघरात पोहोचवणे, तसेच महानगरपालिका निवडणुकीत भाजप व मित्रपक्षांच्या उमेदवारांना भक्कम पाठिंबा मिळवणे, हा या रोड शोचा प्रमुख उद्देश होता. युवकांचा जोश, शिस्तबद्ध सहभाग आणि हजारो दुचाकींच्या उपस्थितीमुळे चंद्रपूर शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापल्याचे चित्र दिसून आले. या रोड शोमध्ये भाजप, शिवसेना व आरपीआयचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच महायुतीचे उमेदवार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

५ हजारांहून अधिक दुचाकींच्या सहभागाने पार पडलेला हा रोड शो महायुतीच्या ताकदीचे आणि निवडणुकीतील आत्मविश्वासाचे स्पष्ट दर्शन घडवणारा ठरला. या निवडणुकीत भाजप एकत्रितपणे प्रचाराच्या मैदानात उतरलेली दिसत असताना, काँग्रेसमधील गटबाजी पुन्हा एकदा उघडकीस आली. समारोपीय सभेत बोलताना चंद्रपूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी भाजपला बहुमताने विजयी करण्याचे आवाहन भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी केले.

# एम्पॉवर अबॅकस अकॅडमीच्या नॅशनल लेव्हल अबॅकस कॉम्पिटिशनचे बक्षीस वितरण उत्साहात

## ६००हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग; ३०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना मानांकन

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.१३, पुणे (वाघोली) :** एम्पॉवर अबॅकस अकॅडमी यांच्या वतीने आयोजित नॅशनल लेव्हल अबॅकस कॉम्पिटिशनचा बक्षीस वितरण समारंभ रविवार, दि. ११ जानेवारी २०२६ रोजी श्रेयश बँकेट हॉल, वाघोली येथे उत्साहात पार पडला. या स्पर्धेचे आयोजन अकॅडमीच्या संस्थापक. सुवर्णा महेश खोत व महेश अशोक खोत यांनी केले होते.




कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. प्रमुख पाहुणे म्हणून बाळासाहेब सातव, शिक्षणाधिकारी, मालती ताई गोगावले, उपसरपंच वाघोली, मेजर शरद सुकाळे, प्रितेश तराळ, राजेंद्र गावडे, अमित हरगुडे, प्रभाकर जाधव, डॉ.सारंग जोशी, ॲड.श्रीकांत गावडे, विधेत्री त्रिवेदी, भाग्यश्री वडगावे आदी मान्यवर उपस्थित होते.

दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. या स्पर्धेत देशभरातून ६००पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामधून ३००हून अधिक विद्यार्थी रँकधारक ठरले, तर उर्वरित सर्व विद्यार्थीही चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले. प्रत्येक उत्तीर्ण विद्यार्थ्याला योग्य बक्षीस देण्यात आले. या स्पर्धेत काही चॅम्पियन विद्यार्थ्यांनी अवघ्या ५ मिनिटांत १०० ते १४४ गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. अध्यक्षीय भाषणात व प्रमुख पाहुण्यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत गणितातील गती, एकाग्रता व आत्मविश्वास वाढविण्यासाठी अबॅकस प्रशिक्षण उपयुक्त ठरत असल्याचे मत व्यक्त केले. एम्पॉवर अबॅकस अकॅडमी ही टीचर ट्रेनिंग व स्टुडन्ट ट्रेनिंगचे वर्ग ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने घेत असून महाराष्ट्रासह देशभरात अकॅडमीच्या विविध शाखा कार्यरत आहेत.

या शाखांमधून हजारो विद्यार्थी अबॅकसचे प्रशिक्षण घेत आहेत. वाघोली परिसरात अशा मोठ्या स्तरावरील राज्यस्तरीय/राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेचे आयोजन प्रथमच झाल्याने पालक व विद्यार्थ्यांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला. कार्यक्रमाची सांगता मान्यवरांचे आभार मानून करण्यात आली.

# अण्णाभाऊंच्या स्मारकासाठी व्यापक कृती समिती

## लोकसहभागातून भव्य स्मारक : आमदार राणाजगजितसिंह पाटील

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.१३, धाराशिव :** धाराशिव शहरात साकारण्यात येणाऱ्या अण्णाभाऊंच्या भव्य स्मारकासाठी व्यापक कृती समिती गठित करण्यात येणार आहे. त्याची नोंदणी करून बँकेत खाते उघडले जाईल. पारदर्शकता रहावी यासाठी केवळ धनादेशाद्वारे थेट बँक खात्यात लोकसहभाग स्वीकारण्यात येईल.

समाजबांधवांसह विविध समाज घटकातील नागरिकांच्या सहभागाने जिल्ह्यातील एक भव्य आणि ऐतिहासिक स्मारक उभारण्याचा आपला प्रयत्न असल्याचे सांगत आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सर्वप्रथम स्वतःचा एक लाख रुपयांचा सहभाग लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मारकासाठी दिला आहे.धाराशिव शहरात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या भव्य स्मारक उभारण्यासाठी शासकीय दूध संघाची जागा विनामूल्य देण्याच्या शासन आदेश शुक्रवारी निर्गमित करण्यात आला. मंत्रिमंडळाच्या बैठकीत त्यावर पूर्वीच शिक्कामोर्तब करण्यात आले होते. या आदेशामुळे नगरपालिकेचे ₹ २ कोटी वाचणार आहेत. लोकशाहीर अण्णाभाऊ यांच्या भव्य आणि ऐतिहासिक स्मारक उभारणीच्या अनुषंगाने सोमवारी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीत स्मारक उभारणीच्या अनुषंगाने विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. सर्वानुमते स्मारकासाठी व्यापक कृती समिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या समितीची अधिकृत नोंदणी करून बँक खाते काढण्याचेही बैठकीत ठरले. सर्व आर्थिक व्यवहारांची पारदर्शकता रहावी यासाठी लोकसहभागाची रक्कम केवळ धनादेशाच्या माध्यमातूनच स्वीकारण्याची सूचना आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी यावेळी केली. त्याला बैठकीस उपस्थित असलेल्या सर्वांनीच उत्स्फूर्तपणे सहमती दर्शवली. स्मारकाच्या उभारणीसाठी नगरविकास विभागाच्या माध्यमातून यापूर्वीच आपण ₹ १.५० कोटी निधी मंजूर करवून घेतला आहे. अण्णाभाऊ साठे यांचे भव्य स्मारक उभारण्यात येणार असल्याचे अभिवचनही आपण पालिका निवडणुकीपूर्वी जाहीर करण्यात आलेल्या वचननाम्यात दिले असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी यावेळी सांगितले.

तत्कालीन महसूल मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी ऑगस्ट महिन्यात जागा हस्तांतरित करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र त्यासाठी नगरपालिकेला शासनाकडे जागेच्या मोबदल्यात बाजारभावाप्रमाणे २ कोटी ८ लाख भरणे आवश्यक होते. पालिकेकडे निधी नसल्याने हा विषय प्रलंबित होता. मात्र शासनाने विशेष बाब म्हणून सदर रक्कम माफ करावी. यासाठी आपण सतत पाठपुरावा केला. त्यानंतर आपल्या महायुती सरकारने मागील पंधरवड्याखाली जागा निःशुल्क उपलब्ध करून देण्याच्या आपल्या मागणीवर शिक्कामोर्तब केले.



सुसज्ज ग्रंथालय, अभ्यासिका आणि उद्यानही या स्मारकाच्या ठिकाणी सुसज्ज असे ग्रंथालय ही उभारण्यात येणार आहे. ज्यात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या समग्र ग्रंथसंपदेसह इतरही मौलिक ग्रंथांचा समावेश असणार आहे. त्याबरोबरच एक अद्यावत अभ्यासिका आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र ही याठिकाणी साकारले जाणार आहे. एमपीएससी आणि युपीएससी परीक्षेचे पूर्वतयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होईल.यात कौशल्य व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र देखील असणार आहे.तसेच विविध प्रकारच्या कार्यक्रमासाठी एक सांस्कृतिक सभागृह देखील याठिकाणी प्रस्तावित आहे. त्याचबरोबर आकर्षक असे भव्य उद्यान आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा जिल्ह्यातील पहिला पूर्णाकृती पुतळा याठिकाणी साकारण्यात येणार असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी यावेळी सांगितले.

आता हे स्मारक भव्य, दर्जेदार व प्रेरणादायी स्वरूपात साकारण्याची जबाबदारी आपली आहे. त्यासाठी समाजातील सर्व स्तरातील विविध घटकांच्या सहकार्याने आणि योगदानातून राज्यभरात लौकिकास पात्र ठरेल असे भव्य स्मारक उभारण्याचा संकल्पही या बैठकीत करण्यात आला. यावेळी दत्ता पेठे, नगरसेवक विलास लोंढे, बापु पवार, कानिफनाथ देवकुळे, शिवाजी गायकवाड नळदुर्ग, युवराज शिंदे, सचिन लोंढे, दयानंद शिंदे, विजय क्षिरसागर तुळजापुर, विलास रसाळ तेर, विलास रसाळ ढोकीकर, अभिमान पेठे, यशवंत पेठे रोहिदास झोबाड,राजु रसाळ, सुमेध क्षिरसागर, किसन पेठे, काकासाहेब पेठे, संतोष पेठे, सतोष मोरे, शंकर मोरे, अंकुश पेठे, शिवाजी क्षिरसागर दादा पेठे, खंडू चांदणे उपस्थित होते.

# डॉ.सोपानराव चव्हाण यांनी शिक्षणातून तालुक्याचा कायापालट केला - प्रा.पाटील

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१२, पाटण (सातारा) :** डॉ.सोपानराव चव्हाण यांनी शिक्षण क्षेत्रात अत्यंत मोलाचे व दूरगामी कार्य केले आहे. त्याचे शिक्षण क्षेत्रातील काम हे एक दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक आहे. तालुक्यातील प्रत्येक मुलाने शिकले पाहिजे आणि त्यांना शहरातील मुलांप्रमाणेच दर्जेदार शिक्षण मिळाले पाहिजे, हीच त्यांची खरी तळमळ होती, असे प्रतिपादन प्रमुख पाहुणे व ग्रंथपाल प्रा अनिल पाटील यांनी केले. ते कोयना एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक डॉ.सोपानराव चव्हाण यांच्या ९१ व्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ.विलास कळंत्रे, प्रा.दत्तात्रय थोरात, प्रा.विनायक माथने, प्रा.सतीश गायकवाड, दिनकर देसाई याचे सह महाविधात्लातील प्राध्यापक शिक्षकेत्तर सेवक विधार्थी विधार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रा.अनिल पाटील यांनी पुढे की, डॉ.चव्हाण यांनी ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. आर्थिक अडचणी, डोंगराळ परिसर आणि नैसर्गिक आपत्ती असूनही त्यांनी कधीही शिक्षण कार्य थांबवले नाही. ग्रामीण भागातील मुलांमध्येही अफाट क्षमता आहे, फक्त त्यांना योग्य संधी मिळाली पाहिजे, हा त्यांचा ठाम विश्वास होता. तालुक्यातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण, आधुनिक संगणक शिक्षण तसेच रोजगाराभिमुख अभ्यासक्रम मिळावेत, यासाठी त्यांनी कोयना एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून शाळा, महाविद्यालये व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांची उभारणी केली. त्यामुळे तालुक्यातील आज हजारो विद्यार्थी शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आले आहेत, असेही अनिल पाटील यांनी नमूद केले. प्राचार्य डॉ.विलास कळंत्रे म्हणाले की, या कार्यक्रमातून डॉ.सोपानराव चव्हाण यांच्या सामाजिक व



शैक्षणिक कार्याला उजाळा देण्यात आला असून, त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी उच्च ध्येय ठेवावे. आपण ज्या समाजातून आलो आहे. त्या समाजासाठी काही तरी केले पाहिजे. हा बोध आजच्या तरुणांनी घ्यावा असे सांगितले. यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण याच्या वाढदिवसानिमित्त पेढे वाटले तर संस्थेच्या सर्व शाखामध्ये त्याचा ९१ वा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

# बल्लारपूर नगरपालिकेच्या उपाध्यक्ष पदी देवेंद्र आर्य यांची निवड

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, विसापूर (चंद्रपूर) :** चंद्रपूर जिल्ह्यातील सर्वात मोठी नगरपालिका असलेल्या बल्लारपूर नगरपालिकेची पहिली सर्वसाधारण सभा दि.१२ जानेवारी २०२६ रोजी खांडक्या बल्लाळशाह सभागृह, नाट्यगृहात दुपारी १ वाजता नवनिर्वाचित अध्यक्ष अलका



अनिल वाढई यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

यामध्ये नगरसेवकांना स्वीकृत सदस्य व उपाध्यक्ष पदांसाठी निवड करावयाची होती. येथील नगरसेवकांनी दोन माजी नगराध्यक्षांच्या निवडीवर स्विकृत सदस्य म्हणून शिक्कामोर्तब केले. यामुळे नगरपालिका सभागृहात दोघे पतीपत्नी म्हणून राहणार आहे. येथील उपाध्यक्ष पदी देवेंद्र सत्यदेव आर्य यांची बिनविरोध झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा मुख्याधिकारी विशाल वाघ यांनी घोषित केले. स्विकृत सदस्य म्हणून माजी नगराध्यक्ष घनश्याम मुलचंदानी, भाजपाचे माजी मावळते अध्यक्ष हरिश शर्मा, माजी उपाध्यक्ष डॉ. सुनिल कुल्दीवार व माजी नगरसेवक भास्कर माकोडे यांची वर्णी लागली. विशेष म्हणजे घनश्याम मुलचंदानी यांची पत्नी रजनी मुलचंदानी या नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक मध्ये सदस्य म्हणून निवडून आल्या आहे.

# थोडक्यात

## ग्रामस्तरीय माती परीक्षण प्रयोगशाळेचे उद्घाटन

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१३, नागपूर :** पारशिवनी तालुक्यातील इटगावयेथे हिमांशू सुनील गोठवाड यांच्या उत्स्फूर्त पुढाकाराने शेतकरी बांधव हितार्थ तालुका कृषी अधिकारी पारशिवनी व सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक (आत्मा) पारशिवनी यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय कृषि विकास योजना सन २०२५-२६ अंतर्गत उभारण्यात आलेल्या ग्रामस्तरीय मृद नमुना चाचणी प्रयोगशाळेचे उद्घाटन सरपंच अतुल काळे यांच्या हस्ते नुकतेच पार पडले.



यावेळी मान्यवरांच्या हस्ते द्वीपप्रज्वलन करण्यात आले, कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून पारशिवनी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी सुभाष जाधव, तालुका कृषी अधिकारी राकेश वसु, मंडळ कृषी अधिकारी जगदीश भालेराव, सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापन प्रमोद सोमकुवर आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. याप्रसंगी तालुका कृषी अधिकारी राकेश वसु यांनी याप्रसंगी प्रयोगशाळेची गरज व माती परीक्षण महत्त्व जमिनीतील नत्र, स्फुरद, पालाश आणि सूक्ष्म अन्नद्रव्यांची तपासणी करणे, स्थानिक पातळीवर प्रयोगशाळा असल्याने अहवाल लवकर प्राप्त होणार त्यामुळे वेळेची बचत याबाबत विस्तृत स्वरुपात माहिती दिली. तसेच गटविकास अधिकारी सुभाष जाधव यांनी या सुविधेमुळे पारशिवनी परिसरातील शेती क्षेत्रात मोठी क्रांती अपेक्षित आहे. माती आरोग्य पत्रिका (Soil Health Card) मिळाल्यामुळे खतांवरील अनावश्यक खर्च कमी होऊन उत्पादनात वाढ होईल असा विश्वास व्यक्त केला. तसेच कृषी मंडळ अधिकारी जगदीश भालेराव यांनी मृद नमुना कसा घ्यावा याबाबत प्रात्यक्षिक करून शेतकरी बांधवांना सविस्तर माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन सहाय्यक कृषी अधिकारी पार्वती जोजार यांनी केले तर उपस्थितांचे आभार सहाय्यक तंत्रज्ञान व्यवस्थापक प्रमोद सोमकुवर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी राजेंद्र गोमकाळे (माजी सरपंच तामसवाडी), नाना राउत (माजी सरपंच, भागेमहारी), भगवान गद्रे (माजी सरपंच चारगाव), आशिष काकडे (सरपंच तामसवाडी, अनिल वांढे (सरपंच गुंढरी (वांढे), सेवानिवृत्त सचिव घारड, इटगाव ग्रामपंचायत सदस्य अभिजित वाहनेझ आरती सूर्यवंशी, सुनील गोठवाड यांनी विशेष योगदान दिले. या प्रयोगशाळेत जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील मातीची तपासणी करून घ्यावी असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले. कार्यक्रमाला कृषी विभागातील सर्व कर्मचारी, परिसरातील शेतकरी बांधव व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनानंतर कारखानदारांकडून २३ लाखांची मदत; ऊसतोड कामगार कुटुंबाला दिलासा

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.१३, धाराशिव :** धाराशिव जिल्ह्यातील मौ.डोंगरवाडी येथील ऊसतोड कामगार गणेश डोंगरे यांच्या अपघाती मृत्यूनंतर प्रशासन आणि साखर कारखान्यांकडून सुरुवातीला दुर्लक्ष होत असताना, मानवी हक्क अभियानाने आक्रमक भूमिका घेत जिल्हाधिकारी धाराशिव यांना दिलेल्या निवेदनामुळेच अखेर या प्रकरणाला गती मिळाली. संघटनेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे संबंधित यश साखर कारखान्याकडून मृत कामगाराच्या कुटुंबाला २३ लाख रुपयांची आर्थिक मदत मिळाली असून हा संपूर्ण न्यायसंघर्षाचा विजय मानवी हक्क अभियानालाच श्रेयस्कर असल्याचे बोलले जात आहे.



कामाच्या ठिकाणी झालेल्या अपघातात गणेश डोंगरे यांचा मृत्यू झाल्यानंतर पत्नी व तीन लहान मुलांचे भवितव्य अंधारात गेले होते. शासन, प्रशासन आणि साखर कारखाने गप्प असताना मानवी हक्क अभियानाने पुढाकार घेत जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर केले. मृत कामगाराच्या कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी शासन व कारखान्यांनी घ्यावी, तसेच किमान ५० लाख रुपयांची मदत द्यावी, अशी ठाम मागणी करण्यात आली होती.

या निवेदनानंतरच संबंधित यश साखर कारखान्याला हालचाल करावी लागली. संघटनेच्या दबावामुळे १९ लाख रुपयांचा धनादेश देण्यात आला, तसेच ऊसतोड कामगार महेश याने घेतलेली ४ लाख रुपयांची उचल पूर्णतः माफ करण्यात आली. त्यामुळे एकूण २३ लाख रुपयांची मदत कुटुंबाला मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे.

मानवी हक्क अभियानाने ही मदत प्राथमिक असल्याचे सांगत मृत कामगाराच्या कुटुंबाला पूर्ण न्याय मिळेपर्यंत संघर्ष सुरूच राहील, अशी भूमिका घेतली आहे. संघटना नसती तर हे प्रकरण दडपले गेले असते, अशी भावना नागरिकांमधून व्यक्त होत असून, या यशाचे सर्व श्रेय मानवी हक्क अभियानाच्या लढाऊ भूमिकेला व प्रशासनावर टाकलेल्या दबावालाच जाते, असे स्पष्ट मत व्यक्त होत आहे.या निवेदनावर मानवी हक्क अभियानाचे जिल्हाध्यक्ष कैलास पवार, जिल्हा सचिव माहन ताटे, समन्वयक अरुणकुमार माने, सय्यद रझाक, सुग्रीव कांबळे यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## ह.भ.प. शिवाजी चौगुले यांना आदर्श पत्रकार पुरस्कारने सन्मानित

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्हा कागल तालुक्यातील मासा बेलेवाडीचा सुपत्र तसेच कामानिमित्त मुंबई कल्याण चिंचपाडातील रहिवासी तसेच कार्यरत असलेले सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई महाराष्ट्र सरकार, गोवा सरकार, गुजरात सरकार... शासकीय कामा व्यतिरिक राजकीय क्रीडा चालू घडामोडीवर लक्षवेधी लिखाण करून समाज प्रबोधन करत असताना कोल्हापूर मंथन फाउंडेशनने त्यांच्या लिखाणाची दखल घेऊन आदर्श पत्रकार म्हणून महाराणी ताराबाई हॉल मंगळवार पेठ कोल्हापूर येथे पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. त्यांच्या आत्ताच्या प्रवासातील ३० वा सन्मान. सदर पुरस्कार वितरण सोहळा कोल्हापूर येथे नुकताच संपन्न झाला.



त्यासाठी प्रमुख उपस्थिती प्रा.किसनराव विठ्ठलराव कुराडे, संचालक शिवराय कॉलेज गडहिंग्लज सुप्रसिद्ध लेखक व साध्वी माताजी स्नेहलोक फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष सागर शेळके संस्थापक मंथन फाउंडेशन आदी मान्यवरांच्या शुभहस्ते पुरस्कार देऊन ह.भ.प शिवाजी चौगुले यांना सन्मानित करण्यात आले.